श्री. गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था

विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६.

दिनांक :-१०/०२/२०२२

## लिलाव सुचना

संस्थेच्या मालकीचे टाटा कंपनीचे वाहन बस मोडेल ५७ **आसन क्षमता बस क्र. MH-26-B-9883**-जे वर्ष २००३ आणि **५३ आसन क्षमता बस MH.-26-B-7823** जे वर्ष २००१ मध्ये खरेदी केलेल्या आहे; सदरील बस **"आहे त्या स्थितीत"** लिलावाद्वारे विक्री करावयाच्या आहेत. लिलावात निर्लेखित बस खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी **अनामत रक्कम रु. १५०००/- प्रति बस** संस्थेच्या खात्यात ऑनलाइन **sbi collect** द्वारे **दि:२३/०२/२०२२, दुपारी १२:३०** पर्यंत भरणा करावे व विहित नमुन्यात संस्थेस अर्ज करून लिलावात भाग घेण्याची परवानगी घ्यावी. **दि:२३/०२/२०२२** रोजी **दुपारी ०२:३० वाजता** लिलावास हजर राहावे. संस्थेचे खाते क्र., नमुना अर्ज, आणि लिलावाच्या नियम व अटी संस्थेच्या **www.sggs.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. दिलेल्या नियम व अटी मान्य असतील तरच लिलावात भाग घ्यावा.

स्वाक्षरीत/-

**संचालक**

**जा.क्र. एसजीजीएसआयईटी/भांडार/निर्लेखन-लिलाव-०१/बस/२०२१-२२** **दिनांक:-०९/०२/२०२२**

श्री..गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपूरी,
नांदेड - ४३१ ६०६.

संस्थेच्या मालकीच्या निर्लेखित केलेल्या वाहनाच्या (TATA make bus) साठी

## -: जाहीर लिलावाच्या अटी :-

**संदर्भ दिनांक १०/०२/२०२२ रोजी दै. प्रजावाणी ह्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली लिलाव सूचना :-**

**ह्या संस्थेच्या मालकीची वाहने (TATA make bus क्र. MH-26-B-9883 आणि MH.-26-B-7823) लिलाव पद्धतीने "आहे त्या स्थितीत" विक्री करावयाची आहे. लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१. लिलावात बोली बोलणाऱ्याने बोली बोलण्याकरिता रु.१५०००/- प्रति बस अनामत रक्कम संस्थेच्या खात्यात ऑनलाइन **sbi collect** मार्फत दि: २३/०२/२०२२, दुपारी १२.३० पर्यंत भरणा करावेत व संस्थेस अर्ज करून बोली बोलण्यासाठी मान्यता घ्यावी.

२. टाटा मेक बस लिलावात ज्यांना विक्री घोषित होईल त्यांनी लिलावाच्या शेवटच्या बोलीची रक्कम जी ठरेल त्या एकूण रक्कमेच्या **५०% रक्कम दिनांक:-०७/०३/२०२२ पर्यंत दुपारी ०४:०० वाजे पुर्वी** संस्थेच्या खात्यात ऑनलाइन **sbi collect** मार्फत भरणा करणे आवश्यक आहे, आणि **उर्वरित ५०% रक्कम दिनांक:-१४/०३/२०२२ पर्यंत दुपारी ०४:०० वाजे पूर्वी भरणा करावी** आणि वाहनाची / गाडीची डिलिवरी / ताबा घ्यावा आणि त्याचवेळी टी. टी. फॉर्मवर स्वाक्षरी करून दिली जाईल.

३. वर नमूद केल्यानुसारची ५०% रक्कम लिलाव घोषित झाल्यानंतर दोन दिवसात भरणा न केल्यास तसेच उर्वरित ५०% रक्कम सात दिवसाच्या आत भरणा न केल्यास आपल्या नावे घोषित झालेला लिलाव रद्द करण्यात येईल आणि आपण भरणा केलेली अनामत रक्कम रु.१५०००/- जप्त करण्यात येईल तसेच सुरवातीस जर ५०% रक्कम भरणा केली व उर्वरीत ५०% रक्कम सात दिवसाचे आत भरणा नाही केली तर सुरुवातीस भरणा केलेली ५०% रक्कम देखील जप्त करण्यात येईल.

४. गाडीचा लिलाव कोणतेही कारण न दाखवता रद्द करण्याचा, पुढे ढकलण्याचा व योग्य किंमत न आल्यास गाडी विक्री न करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवलेला आहे.

५. सदरील गाडीचा (वाहनांचा) आपणास ताबा दिल्यानंतर गाडीचे जे मोटार वाहन नियमान्वये जे कर भरणा करावे लागतील ते कर भरणा करण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील. संस्था सदरील वाहनाचा लिलाव झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही. सदरील बस आहे त्या स्थितीत लिलाव करण्यात येत आहे.

६. लिलावात बोली बोलण्यासाठी भरलेली अनामत रक्कम रु.१५०००/- ज्यांची नावे घोषित झाली नसतील अशांना सात दिवसात परत करण्यात येईल, परंतु ज्यांच्या नावे लिलाव घोषित झाला असेल त्यांची अनामत रक्कम वाहनांची संपूर्ण लिलाव रक्कम मिळाल्यानंतरच परत करण्यात येईल.

७. वरील सर्व अटी बोली बोलणाऱ्याना बंधनकारक राहतील.

८. उपरोक्त अटीशिवाय लिलाव समितीस मा.संचालकाचे जसे आदेश मिळतील (तोंडी किंवा लेखी) त्यानुसार अटी देखील लिलावात भाग घेणाऱ्याना बंधनकारक राहतील.

स्वाक्षरीत/-

**संचालक**